जिल्हा तांत्रिक सेवा, वर्ग-३ (बांधकाम) संवर्गातील कनिष्ठ अभियंत्यांची दि.१.१.२०१४ रोजीची अंतिम ज्येष्ठता सुची संदर्भात मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे दाखल रिट याचिका क्र. ५१३५/२०१७ अनुषंगाने मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार करावयाची कार्यवाही.

महाराष्ट्र शासन

ग्राम विकास विभाग

शासन आदेश क्रमांकः न्यायप्र-२०१७/प्र.क्र.३२/आस्था-४

बांधकाम भवन, २५ मर्झबान पथ,
फोर्ट, मुंबई ४०० ००१.
तारीख: १३ सप्टेंबर, २०१७

शासन आदेश

जिल्हा तांत्रिक सेवा, वर्ग-३ (बांधकाम) संवर्गातील कनिष्ठ अभियंत्यांची दि.१.१.२०१४ रोजीची अंतिम ज्येष्ठता सुची दि. १७.०८.२०१५ रोजी प्रसिध्द करण्यात आली होती. श्री. वि. रं. दरफडे,कनिष्ठ अभियंता, जिल्हा परिषद, जालना यांनी दि. २०.०२.२०१७ च्या निवेदनाद्वारे प्रस्तुत ज्येष्ठता सूचीबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी,जि.प.जालना यांच्यातर्फे आक्षेप नोंदविला होता तसेच यासंदर्भात मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे रिट याचिका क्र.५१३५/२०१७ दाखल केली होती.

२. रिट याचिका क्र. ५१३५/२०१७ बाबत मा.उच्च न्यायालयाने दि.७.७.२०१७ रोजी निर्णय देतांना श्री.दरफडे,कनिष्ठ अभियंता यांच्या दि.२०.०२.२०१७ रोजीच्या निवेदनावर आदेशाच्या दिनांकापासून ६ आठवड्यात निर्णय घेण्याचे निर्देश दिले आहेत. श्री. दरफडे यांनी दाखल केलेल्या रिट याचिकेमध्ये श्री.ए.एन.मुलगीर, कनिष्ठ अभियंता, जिल्हा परिषद, अहमदनगर, श्री.पी.पी.रायभोगे, कनिष्ठ अभियंता, जिल्हा परिषद, हिंगोली व श्री.एस.एम.नाईक, कनिष्ठ अभियंता, जिल्हा परिषद, यवतमाळ या कनिष्ठ अभियंत्यांच्या दि.१.१.२०१४ रोजीच्या ज्येष्ठता सूचीतील ज्येष्ठता क्रमांकावर आक्षेप नोंदविला असून या कनिष्ठ अभियंत्यांना प्रथम नियुक्ती दिनांकापासून देण्यात आलेली सेवा ज्येष्ठता शासन निर्णय दि.३०.०४.१९८५ व शासन पत्र क्र.झेडएनजी १००४/प्र.क्र.१२२९/आस्था-४,दि.६ डिसेंबर,२००४ मधील निर्णयाशी विसंगत आहे असा दावा केला आहे व आपला ज्येष्ठता क्रमांक श्री.मुलगीर, श्री.रायभोगे व श्री.नाईक यांच्या ज्येष्ठता क्रमांकाच्या आधी निश्चित करण्याची मागणी सदर निवेदनांद्वारे केली आहे.

३. ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय दिनांक २६ एप्रिल,२००१ अन्वये, दि.१ एप्रिल,१९८१ पासून जिल्हा परिषदेतील पाटबंधारे व बांधकाम विभागातील जिल्हा तांत्रिक सेवा (वर्ग-३) अभियांत्रिकी संवर्गातील पदवीधर कनिष्ठ अभियंत्यांना तसेच भविष्य काळात त्या पदावरील नेमणुकीसाठी सेवेत भरती होणाऱ्या कनिष्ठ अभियंत्यांना तसेच प्रस्तुत शासन निर्णयांत नमुद सेवाकाळ पूर्ण केलेल्या पदविकाधारक व अर्हतारहित कनिष्ठ अभियंत्यांना सहायक अभियंता/ शाखा अभियंता या "राजपत्रित पदाचा" दर्जा देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच,जिल्हा परिषद सेवेत असतांना जे पदविकाधारक कनिष्ठ अभियंते ए.एम.आय.ई या संस्थेतून स्थापत्य,यांत्रिकी अथवा विद्युत अभियांत्रिकी या विषयातील पदवी धारण केल्यास त्यांनी कनिष्ठ अभियंता म्हणून व्यतीत केलेल्या सेवेपैकी ३/८ सेवा गृहीत धरून त्यांना पदवीधर अभियंता म्हणून ज्येष्ठतेसाठी मानीव दिनांक देण्याची तरतूद आहे.

४. श्री.दरफडे,कनिष्ठ अभियंता यांनी दि.२०.०२.२०१७ रोजीच्या निवेदनाद्वारे, शासन पत्र दि.६.१२.२००४ अन्वये, नियुक्तीपूर्वी पदवी धारण केलेल्या कनिष्ठ अभियंत्यांना सेवाज्येष्ठता ही तीन वर्षे सलग सेवा पूर्ण केल्यानंतर येणाऱ्या १ एप्रिल पासून देणेबाबत स्पष्ट निर्देश दिले असल्याने जिल्हा तांत्रिक सेवा,वर्ग-३ (बांधकाम) संवर्गातील कनिष्ठ अभियंत्यांची दि.१.१.२०१४ रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या अंतिम ज्येष्ठता सुची सदोष असल्याबाबत आक्षेप नोंदविला आहे. यामध्ये सर्वश्री रायभोगे, मुलगीर व नाईक यांचा नियुक्ती दिनांक चुकीचा असल्याबाबत आक्षेप घेतला आहे. श्री.दरफडे, कनिष्ठ अभियंता यांनी आक्षेप घेतलेल्या उक्त अभियंत्यांची माहिती संबंधित जिल्हा परिषदांकडून मागविण्यात आली असून सदरहु माहितीनुसार सर्वश्री मुलगीर,रायभोगे व नाईक कनिष्ठ अभियंता हे सेवेत प्रवेश करतेवेळी पदवी धारण करत होते. त्यामुळे सदरहु अभियंत्यांची ज्येष्ठता प्रथम नियुक्तीच्या दिनांकापासून निश्चित करण्यात आली आहे.

५. श्री. दरफडे, कनिष्ठ अभियंता यांनी आक्षेप घेतलेली व दि.१.१.२०१४ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली अंतिम ज्येष्ठता सुची ही कनिष्ठ अभियंता या संवर्गातील कर्मचाऱ्यांची आहे.ज्येष्ठतेच्या सर्वसाधारण तत्वानुसार शासकिय कर्मचाऱ्यांची ज्येष्ठता सामान्यपणे त्यांच्या त्या पदावरील संवर्गातील किंवा सेवेतील अखंड सेवाकालावरून निश्चित करण्यात येते. उक्त अभियंत्यांना सहायक अभियंता श्रेणी-२ पदाचा दर्जा प्रदान केला तरी त्यांची कनिष्ठ अभियंता या संवर्गातील ज्येष्ठता सदरहू दर्जा प्रदानतेमुळे बाधीत होत नाही. तसेच कनिष्ठ अभियंता यांना सहायक अभियंता श्रेणी-२ पदाचा दर्जा प्रदान केल्यामुळे कनिष्ठ अभियंत्यांच्या कर्तव्य व जबाबदा-यांमध्ये कोणताही बदल होत नाही.

६. यास्तव उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेता, श्री.दरफडे, कनिष्ठ अभियंता यांनी दि.२०.२.२०१७ व दि.०३.०४.२०१७ रोजीच्या निवेदनाद्वारे केलेली विनंती अमान्य करण्यात येत असून दि.१.१.२०१४

रोजीची (बांधकाम) संवर्गातील कनिष्ठ अभियंत्यांची अंतिम ज्येष्ठता सुची यामध्ये बदल करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक 201709131209214220 असा आहे. सदर आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Vivek Ramesh Shinde

Digitally signed by Vivek Ramesh Shinde
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Rural Development, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=98222e73b61528cee875e0cab75e02437703c365921479fb0198fcf43d79d224, serialNumber=3d2f2d59501068679dd214122d63cb4d2d18b76f5a89cae6eca0162ae6701444, cn=Vivek Ramesh Shinde
Date: 2017.09.13 13:21:20 +05'30'

(वि.र. शिंदे)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१. मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद
२. विभागीय आयुक्त, औरंगाबाद विभाग
३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद जालना.